नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०९/२०२५ (रविवार)**

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयात लोकअदालत मध्ये १३८० प्रकरणे निकाली तर ११,३७,७५० रूपायांचा दंड वसुल

**नागपुर ग्रामीण जिल्हया अंतर्गत दिनांक १३/०९/२०२५ रोजी आयोजीत महालोकअदालत यशस्वी रित्या पार पडली. नमुद लोकअदालत मध्ये खालील प्रमाणे प्रकरणे निकाली काढण्यात आली.**

**नागपुर उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन मधील** ३४० प्रकरणे निकाली काढून एकूण १४५०००/— रुपये दंड वसुल करण्यात आला आहे. **काटोल उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन मधील** ११५ प्रकरणे निकाली काढून एकूण ३१,५००/— रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.**उमरेड उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन मधील** एकुण २४१ प्रकरणे निकाली काढून एकूण ४,६१,०५०/— रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.**रामटेक उपविभागातील** सर्व पोलीस स्टेशन मधील एकूण २०४ प्रकरणे निकाली काढून एकूण १,५०,४००/— रुपये दंड वसुल करण्यात आला आहे. **कन्हान उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन** मधील एकूण ९९ प्रकरणे निकाली काढून एकूण **१,३२,३००**/— रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.**सावनेर उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन मधील** एकूण ३८१ प्रकरणे निकाली काढून एकूण २,१७,५००/— रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**वरप्रमाणे कलम २८५ भा.न्या.सं अन्वये (सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस अडथळा किंवा धोकादायक रित्या वाहन उभे करणे ) ७२२ प्रकरणे, मदयपान करून वाहन चालविणे ड्रंक ॲड ड्राईव्ह च्या १८५ केसेस २०७ , जुगाराच्या ९३ प्रकरणे तसेच इतर प्रकरणे असे एकुण १३८० प्रकरणे निकाली काढण्यात आली आहे.तसेच ११,३७,७५० रूपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. ८ लाख ३३ हजार ६०० रूपयांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर**:— दिनांक १४/०९/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, कळमेश्वर पोलीस स्टेंशन हद्दीतील मौज डोरली येथील फॉरेस्टच्या मोकळया जागेत काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले आणि सापळा रचुन धाड टाकली असता काही इसम ५२ ताशपत्यांचा जुगार खेळतांना दिसुन आले. आरोपी नामे १) हर्षल अनिल ठाकूर ,वय २५ वर्ष, रा. सावनेर जि. नागपूर २) जयकिशन अण्णाजी सुतार, वय २९ वर्ष रा. मोहपा कळमेश्वर, जि. नागपूर ३) रणजीत अमृतराव गिरी, वय ३४ वर्षे, रा डोरली कळमेश्वर,जि. नागपूर, यांना पोलीसांनी जागीच पकडले नावे तसेच आरोपी क्रं ४) राकेश मधु हे लोंढे, वय ४५ वर्ष, रा. डोरली कळमेश्वर,जि. नागपूर,६) सागर उर्फ अण्णा वल्लोरवार, वय ४२ वर्ष, रा. डोरली , कळमेश्वर जि. नागपूर,७) मोनू उर्फ अभिषेक सुधाकर वीरखडे, रा. सावनेर नागपूर ८ प्रणय डावरे,राहणार सावनेर नागपूर. यांच्यासह ५ ते ६ आरोपी पोलीसांना पाहुन घटनास्थळावरून पसार झाले.

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तासपत्ते , रोख रक्कम १०,६००/— रूपये, तीन ॲड्रॉईड मोंबाईल,एक दुचाकी वाहन, एक चारचाकी वाहन तसेच बॅटरी व लाईट संच असा एकुण कि ८,३३,६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द कलम १२ म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. ३ लाख ९० हजार ८०० रूपयांचा मुद्देमाल जप्त बेला पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बेला** :— दिनांक १३/०९/२०२५ रोजी बेला पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा मौजा सालेभट्टी येथील मच्छी तलावाजवळ काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले आणि सापळा रचुन धाड टाकली असता आरोपी नामे ०१) नितेश अरविंद चुटे, वय ३० वर्ष ,०२) राहुल सुभाष लाडे ,वय ३१ वर्ष, ०३) भोजराज मनोहर मेहर, वय ४३ वर्ष, सर्व रा सिर्सी, ता उमरेड हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. काही इसम पोलीसांना पाहुन

घटनास्थळावरून पसार झाले. **पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तासपत्ते , रोख रक्कम ५,८००/— रूपये सहा मोटर सायकलन असा एकुण कि ३,९०,८००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी क्र १ ते ३ आणि इतर ३ पाहीजे आरोपी अशा ६ आरोपीतांवर कलम १२(अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अंमलीपदार्थ गांजा बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## अंमली पदार्थ कारवाई पथक नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी**:— दिनांक १३/०९/२०२५ रोजी अंमली पदार्थ कारवाई पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हद्दीत गंगापुर झोपडपट्टी टाकळघाट येथे महीला आरोपी ही तिचा साथीदार नामे नागेश विलास पिल्लेवान, वय २५ वर्षे, रा टाकळघटा ता हिंगणा जि नागपुर याच्या मदतीने तिचे राहते घरी गांजाची विक्री करते. मिळालेल्या महीतीच्या आधारे नमुद पथकाने घटनास्थळी जावुन महीला आरोपीच्या घराची झडती घेतली असता ८६१ ग्रॅम वाजनाचा हिरवट गांजा सदृश्य पदार्थ किंमती ८,५००/—रुपये, गांजा विक्रीतुन मिळालेले पैस एकुण ६०००/— रूपये, गांजा विक्री तसेच वाहतुकीसाठी वापरत असलेली मोपेड गाडी क्रमांक एम. एच ४० सि.व्ही ६७८१ किंमती ९०,०००/— रूपये एक एकुण १,०४,५००/— रूपयांचा मुद्देमाल मिळुन आला. पोलीसांनी नमुद मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला.

महीला आरोपी रा. गंगापुर झोपडपटटी, टाकळघाट, जि. नागपुर आणि नागेश विलास पिल्लेवान, वय २५ वर्षे, रा टाकळघटा ता हिंगणा जि नागपुर यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी, येथे एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने